# भारतीय समाजशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व

**डॉ. संदीप रामराव गोरे**
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख
श्री. योगानंद स्वामी महाविद्यालय, वसमतनगर
जि. हिंगोली – ४३१ ५१२

भारतीय समाजाचे वैशिष्ट्य त्याच्या विविधतेत आहे. भारतामध्ये विभिन्न जातीचे लोक राहतात- व त्यांचे वर्तनप्रकार वेगवेगळे आहेत. अनेक रूढी आणि परंपरा यांचा ते स्विकार करतात. कार्यिक दृष्टीकोनातून भारतीय समाजाकडे पाहणारे विचारवंत त्या बहुविविधतेला फारसे महत्व न देता भारतीय समाजातील ऐक्य कसे आहे, यावर जास्त भर देतात. पण भारतीय समाजाच्या अनेकविध अशा सामाजिक रचनेकडे विशेष लक्ष देऊन त्याचे विश्लेषण करणे आवश्यक ठरते. त्याकरीता बंबात्मक किंवा विरोधावर अधिष्ठित विकासाच्या दृष्टीकोनाचा स्विकार करणे अगत्याचे ठरते.

विरोधातून होणारा किंवा विरोधाधिष्ठित विकास म्हणजे काय हयाचा विचार करतांना मार्क्सचे तत्वज्ञान हे मुख्यत: विरोधाधिष्ठित विकासवाद असे मानले जाते. त्याची कल्पना मार्क्सला त्याचे गुरू हेगेल यांच्यापासून मिळाली होती हेगेलच्या तत्वज्ञानाची मूळ भूमिका अशी होती की, भौतिक सृष्टी हे कल्पनासृष्टीचेच रूप असते. मानवी कल्पना सृष्टीतील येणारा बदल हा विरोधातून येणाऱ्या विकासामुळे होत असतो. त्याचप्रमाणे भौतिक सृष्टीत होणारा बदलही विरोधातून विकास हया प्रक्रियेतून होत असतो.

एखादी विशिष्ट कल्पना मांडावयाची झाल्यास काही जणांची भूमिका त्या कल्पनेच्या अनुरूप असेल. अशा वेळी काही जणांनी विरोधात्मक भूमिका घेतली. तर अशा प्रतिपादनामुळे दोन्ही पक्षांच्या विवेचनातील सत्याचा शोध घेऊन समन्वय साधण्याचा प्रयत्न तिसरी एखादी व्यक्ती करते आणि हया विरोधातूनच मानवी प्रगती साधलेली असते असे हेगेलचे मत होते. मार्क्सने हेगेलच्या विरोध विकासवादाचा स्विकार केलेला असला तरी त्यातील आदर्शवाद मात्र स्विकारलेला नाही. आदर्शा ऐवजी मार्क्सने भौतिकवादाचा पुरस्कार केला. आत्मतत्वाच्या जागी भौतिक आणि सत्य घटनांना मांडले आणि त्यावरून हेगेलच्या सिद्धांताच्या बरोबर उलटा विरुद्ध सिद्धांत मांडला. मार्क्सच्या मतानुसार विरोध विकास पद्धतीने जो विश्वविकास होतो. त्याचे मुळ कारण भौतिकविश्व हेच आहे आणि हेगेलने प्रतिपादिल्याप्रमाणे आत्मतत्व हे नाही. या भौतिकवादाच्या आधारानेच ऐतिहासिक उत्क्रांतीचे मार्क्सने स्पष्टीकरण दिले आहे. मार्क्सच्या हया मतप्रणालीस विरोध विकासाधिष्ठित भौतिकवाद असे म्हणतात. मार्क्सच्या मुलभूत सिद्धांतात भौतिक उत्पादनशक्तीचा विकास म्हणजेच मानवी समाजाचा विकास होय. सर्व ऐतिहासिक घटना अशा विकासामुळे घडत असतात. कोणत्याही समाजातील धार्मिक, सामाजिक, भौतिक, नैतिक, राजकीय संस्थांचे अस्तित्व,

त्यांचे स्वरूप व कार्य त्या त्या समाजातील उत्पादनपद्धतीवर अवलंबुन असते. पर्यायाने जगाच्या इतिहासात आर्थिक घटकांना फार महत्वाचे स्थान असते, असे मत मार्क्सने मांडले. इतिहासातील घटना सिद्ध करतात की. इतिहासावर समाजातील निरनिराळ्या संस्थांच्या रूपाने व्यक्त होणाऱ्या भौतिक घटनांचा प्रभाव पडत असतो. अशा संस्थांमधील परस्पर संबंध मालमत्तेशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रूपाने जोडलेले असतात. म्हणुन अशा संस्थांमध्ये संघर्ष होतात. परिणामी जगाचा इतिहास हा वर्गकलहाचा इतिहास ठरतो. पुढे जाऊन मार्क्सने असेही मत मांडले आहे की, प्रत्येक संस्था आपल्या जन्माबरोबरच आत्मनाशाची बीजे घेऊन येत असते. तसेच आपल्या विकासाबरोबर स्वतः च्या नाशास कारणीभूत होणाऱ्या घटकांची जोपासना करीत असते.

प्रगतीसाठी एखादी संख्या जेव्हा प्रयत्न करीत असते, त्याचवेळी त्या संस्थेची शक्ती त्या संस्थेचे उच्चाटन करणाऱ्या शक्तींची जोपासना नकळत करीत असते. अशा प्रकारे धन व ऋण शक्तींच्या संघर्षामधुन एक वेगळ्याच प्रकारची सुसंबद्ध अवस्था तयार होत असते मार्क्स सामाजिक परिवर्तनाचे मुळ अर्थव्यवस्थेत शोधतो व त्याने दिलेली ही दृष्टी काही समाजशास्त्र अत्यंत महत्वाची मानतात.

'माणसे सामाजिक उत्पादनात भागीदार होत असताना काही अपरिहार्य आणि आपल्या इच्छेपलिकडील अशा निश्चित प्रकारच्या सामाजिक संबंधांनी एकत्र येत असतात. हे उत्पादनाचे संबंध भौतिक उत्पादक शक्तींच्या विकासातील विशिष्ट अवस्थांशी संलग्न असतात. या उत्पादन संबंधाची गोळाबेरीज म्हणजे समाजाची अर्थ रचना हा खरा पाया आहे ज्यावर कायद्याची व राजकीय इमारत उभी केली जाते व ज्याच्याशी सामाजिक जाणीवेचे निश्चित प्रकार संलग्न असतात, भौतिक जीवनातील उत्पादनाचे स्वरूप सामान्य सामाजिक, राजकीय व बौद्धिक जीवनाची प्रक्रिया नियंत्रित करत असते.' पुढे जाऊन ढोबळ मानाने असे म्हणता येते की, भांडवलशाही उत्पादनाचे संबंध उत्पादनाच्या सामाजिक प्रक्रियेमधील अखेरची अंतर्गत विरोधी असणारी अवस्था आहे. हा विरोध वैयक्तिक नसुन व्यक्तींच्या जीवनावर सामाजिक परिस्थितीचा होणारा परिणाम यातुन तो निर्माण होतो. त्याचवेळी भांडवलशाही समाजाच्या गर्भात वाढलेल्या उत्पादक शक्तींनी अशी भौतिक परिस्थिती निर्माण केली आहे, ज्यामुळे हा विरोध नष्ट करता येतो, अशा प्रकारची सामाजिक रचना म्हणजे मानवी प्रागैतिहासिक अवस्थेचा शेवट आहे असे म्हणता येईल. मावसच्चे स्वतः चे वैशिष्ट्य म्हणजे तो आर्थिक वातावरणाला इतरांपासून वेगळे करतो व त्याचा सामाजिक संस्था घडविण्यास परिणाम होतो असे दाखवितो, थोडक्यात मार्क्सला असे म्हणावयाचे आहे की, सामाजिक जीवनाचे स्वरूप उत्पादनाच्या प्रकाराशी संबंधित आहे समाजात वर्ग आहेत म्हणूनच विषमता आहे कोणत्याही समाजात दोन प्राथमिक वर्ग आहेत व हे वर्ग तत्कालीन समाजाच्या संपत्ती प्रकाराशी व मालकीशी संबंधित आहेत सरजामशाही व भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील भांडवलदार व गुलाम, भूदास व कामगार हे दोन वर्ग होत. मावर्तने विरोध विकासवाद हेगेलकडून उचलला आहे व त्याचा वापर भौतिक परिस्थितीतील बदल सांगण्याकरीता त्याने केला आहे. दोन परस्परविरोधी तत्वे म्हणून हे परस्परविरोधी वर्ग असतात.

मार्क्सच्या मते एका वर्गाचे शोषण हाच दुसऱ्या वर्गाच्या विकासाचा पाया असतो. त्याने असे प्रतिपादन केले की, समाजातील एका वर्गाने दुसन्या वर्गाचे स्वतःच्या हिताकरीता शोषण न करणे यातून वर्गविहिन समाज किंवा शोषणविरहित समाज निर्माण होईल.

मार्क्सच्या तत्वप्रणालीत विमर्शक व तात्विक घटकांमध्ये समाजशास्त्रीय संकल्पनांचा उपयोग समाजशास्त्रज्ञांनी केला आणि मार्क्सच्या विरोध-विकासावर अधिष्ठित दृष्टीकोनात सुधारणा केली. भारतामध्ये मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव काही विचारवंतावर पडलेला आढळतो. काहींनी त्यावरून जातीसंस्थेचे आर्थिक प्रतिपादन केले. काही विचारवंतांनी उत्पादन विकासाच्या अवस्थानुसार वर्गव्यवस्थेचा विकास कसा झाला हे मांडण्याचा प्रयत्न केला. काही जाणकारांनी भारतीय समाजातील विकासाच्या अवस्था आर्थिक संस्थांशी संबंधित आहेत असे दाखविण्याचे कार्य केले. आधुनिक काळात कम्युनिस्ट पक्ष व काँग्रेस पक्षातील बरेचसे पुढारी यांच्या विचारांवर मार्क्सवादी विचारांचा पगडा होता. जवाहरलाल नेहरू. एम. एम. रॉय, जयप्रकाश नारायण यांनी प्रथम जरी या विचारसरणीचा पुरस्कार केला तरी नंतर मात्र त्याला विरोध केला. ब्रिटीश समाजातील शास्त्र, मानवशास्त्र व भारतातील समाजशास्त्रज्ञानी कार्यवाही दृष्टीकोनाचा पुरस्कार केला व विरोध विकासाला फारसे महत्व दिले नाही तरीही डी. पी. मुखर्जीसारखे काही भारतीय समाजशास्त्रज्ञ मार्क्सवादी पद्धती शास्त्राचे महत्व मानतात. या समाजशास्त्रज्ञाने भारतातील सामाजिक प्रक्रियाचा अभ्यास विरोध विकासवादाच्या दृष्टीकोनातुन केला आहे. त्यांच्या मते भारतीय परंपरा व पाश्चात्य परंपरा यांचा एकमेकींशी संबंध आला. परिणामी भारतीय संस्कृतीतील काही विरोध कमी झाले किंवा नष्ट झाले तर त्याच वेळी नवीन मध्यम वर्गाचा उदय झाला. पाश्चात्य आणि पौर्वात्य संस्कृतींच्या संपर्कामुळे या दोन परस्परविरोधी शक्तींचा एकमेकात तात्विक आणि वैचारिक संघर्ष सुरू झाला. भारतीय परपरेचे विशेष वैशिष्टय म्हणजे तिची सढीप्रियता आहे. नवीन सुधारणा किंवा विचारप्रवाह यांचा घाईघाईने स्विकार कधी झाला नाही तर अन्वय, विरोधान्वय व शेवटी समन्वय या विरोध विकासाच्या तीन अवस्थांमधून जाऊन भारतात नविन वर्गनिष्ठित रचना उदयास आली 'विरोधान्वय' ह्या मधल्या अवस्थेत उलट सुलट विचारांची देवाणघेवाण होऊन विचार प्रस्थापित होतात. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य यांच्यातील विरोधी मुल्य आणि वर्ग अधिष्ठित अभिरुची यांच्यात समन्वय घडून आला आणि आवश्यक असलेली स्थित्यंतरे घडून आली. बैताकडून अद्वैताकडे नेणारी ही पी. डी. मुखर्जीची विचारसरणी मावसेच्या विचारप्रणालीचा प्रभाव दर्शविते. भारतावर इस्लामी राज्यकत्यांचा अधिकार व प्रभाव होता, तेव्हापासून ते सध्याच्या काळापर्यंत भारतीय समाजाला विरोधासह आपली संस्कृती समन्वित करून परंपरा व स्थित्यंतरे पुढे गाठावयाची आहेत. भारतातील मध्यमवर्ग हा भारतीय परंपरा किंवा आधुनिकीकरण यामुळे निर्माण झालेला नाही.

विरोध-विकासवादी दृष्टीकोन वापरला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश वसाहतवादामुळे ज्या आर्थिक सुधारणा झाल्या, त्याचा परिणाम म्हणजे भारतात ब्रिटीशपूर्व काळातही नसलेला राष्ट्रवाद निर्माण

झाला आहे. नवीन प्रकारची सामाजिक जाणीव व नवीन अस्तित्वात आलेली वर्गरचना यामुळे राष्ट्रवाद निर्माण झालेला दिसतो.

ब्रिटीश कालखंडात वेगवेगळ्या वर्गाच्या वेगवेगळ्या तक्रारी होत्या. भारतीय उद्योगधंदे चालविणाऱ्यांची इच्छा अशी होती की, त्यांना उद्योग व्यवसाय चालविण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असावे. भारतीय उद्योग धंद्यांना पूर्ण संरक्षण मिळावे. नोकरी करणाऱ्या वर्गाचे म्हणणे असे होते की, नोकरीतील वरच्या पदांवर व अधिकाराच्या जागांवर **फक्त** ब्रिटीश व्यक्तींच्याच नेमणुका होत होत्या. शेतीवरील कर कमी करण्याची मागणी शेतकरी वर्ग करीत होता. कामगार वर्ग अधिक पगार व कामाच्या ठिकाणी उत्तम सोयींची एकमुखाने मागणी करीत होता. तर सर्व देशाच्या पातळीवर संघटना स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य कायदेमंडळ व शेवटी संपूर्ण 'राजकीय स्वातंत्र्य मिळावे अशी जनतेची मागणी होती. यावरून असे निदर्शनास येते की, भारतातील राष्ट्रवादाची भावना ही नवीन सामाजिक व भौतिक परिस्थितीचा परिणाम म्हणून उदयास आली आहे. ब्रिटीशांच्या आक्रमणामुळेच हा राष्ट्रवाद उदयास आला. भारतीय समाजाचे व ब्रिटीश समाजाचे या देशातील हेतु भिन्न होते. हया दोन वेगवेगळ्या हेतुंमध्येच संघर्ष निर्माण झाला व त्याचा परिणाम म्हणून राष्ट्रवादाचा जन्म झाला. डॉ. देसाईनी आपल्या विवेचनात पुढे असेही म्हटले आहे की, इंग्रजांमुळे भारतात नवीन शिक्षणपद्धती आली. इंग्रजीमुळे तांत्रिक व शैक्षणिक प्रगती झाली असेल. पण राष्ट्रवाद (हा फक्त) इंग्रजी शिक्षणामुळे निर्माण झाला असे म्हणणे चुकीचे आहे. म्हणूनच थोडक्यात असे म्हणता येते की, भारतीय समाजशास्त्रज्ञांच्या राष्ट्रवादी विवेचनात विरोध विकास वादाचा उल्लेख असतो, ददात्मक वा विरोध विकास वादाची कल्पना जशी वापरली गेली, तशीच त्यावर टीकाही झाली. योगेंद्र सिंघ यांनी टीका करताना म्हटले आहे की, भारतीय सामाजिक स्थित्यंतराचा परिपूर्ण अभ्यास करण्याकरीता आवश्यक असलेली पुरेशी वस्तुनिष्ठ माहिती आपल्याला मिळत नाही. त्यामुळे या पद्धतीच्या गृहितकांना आव्हान देणे सोपे असते,

शेवटी असे म्हणता येईल की, विरोध विकास पद्धतीतील काही उणीवा लक्षात घेऊनही स्थित्यंतर आणि संघर्षात्मक विविध प्रक्रियांचे विश्लेषण करण्याकरीता ही एक उत्तम पद्धती आहे. शास्त्रशुद्ध संशोधनावर भर देऊन व या पद्धतीचा उपयोग करून भारतीय समाजशास्त्रात झालेले संशोधन कार्य हे उपयुक्त आणि मार्गदर्शकही आहे. भारतीय समाजाच्या अनेकांगी विशेषत्वामुळे हा दृष्टीकोन उपयुक्त ठरतो.